## संसर्गजन्य आपत्ती

# स्वाईन फ्ल्यु (H1N1)

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, परभणी.

## जिल्हा परभणी.

## स्वाईनफ्ल्यु किवा स्वाईन इन्फ्ल्युनआ

स्वाईनफ्ल्यु किवा स्वाईन इन्फ्ल्युनआ हा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. सदरील आजार हा डुक्कर हया प्राण्यामध्ये आढुन येतो, स्वाईनफ्ल्युची लागण शक्यतो मणुष्यांना होत नाही. पण क्वचीत प्रसंगी डुकरापासुन सदरील लागण होते.

### जोखीम कोणाला आहे :-

- ज्या व्यक्तींना लागण / आजार आहे त्याच्या संपर्कात आलेली व्यक्ती .
- ज्याने नजीकच्या काळात प्रवास केला आहे जेथे हया आजाराची व्यक्ती आहे.
- नजदीक संपर्क ( Close Contact ) म्हणजे आजारी व्यक्ती सोबत / काळजी करणारा किंवा त्याच्या सरळ संपर्कात (ज्याची श्वसनाची लाळ / स्त्राव ) आलेला आहे.

### लक्षणे:-

ताप, खोकला, घसा खवखव करणे, नाक गळणे, अंग दुखणे, डोके दुखणे, थंडीताप, उलटी संडास थकवा.

### स्वाईनफ्ल्यु कसा पसरतो :-

- खोकला / शिंकामधुन स्त्राव निघतो- हवेतुन / स्त्राव
- कोणत्याही वस्तुवर पडतो - हात लागतो - हात तोंडाला किंवा नाकाला लागतो - स्वाईनफ्ल्यु होण्याची शक्यता वाढते.

### औषधेपचार:-

स्वाईन फ्ल्युसाठी उपलब्ध लस आहे.
औषधे - टॉमी फल्यु /रिलायझां
लक्षणानुसार उपचार उदा- अंगदुखी, सर्दी, डोके दुखी, खोकला, तापसाठी लागणारे वेदनाशामक / जंतु नाशक औषध योग्य त्या प्रमाणात घेणे.

व्यक्तीगत काळजी :-

- आजारी व्यक्तीच्या संपर्कात येणे टाळावे.
- संपर्कात आल्यास व त्रास होउ लागल्यास घरी राहणे चांगले जेणे करुन त्याची दुस-याला लागण होणार नाही.
- आपल्या जवळील डॉक्टरांना भेटणे.
- तोंडावर, नाकावर शिंकतांना खोकलतांना कागद किंवा रुमाल ठेवणे .
- शिंक तांना /खोकलतांना हात नाक ावर तोंडावर ठेवल्यास, हात स्वच्छ पाण्याने धुवुन घ्यावा. रुमाल /क ागद नसलयास हाताच्या कोप-यात खोकलणे किंवा शिंकणे हात डोळयाला किंवा तोंडाला सतत लावु नये.
- शक्यतो हस्तांदोलन करु नये./ जवळीकता दाखविण्याचे कृत्य करु नये.

संसर्ग कसा टाळावा:-

- आजारी व्यक्तीला शक्यतो वेगळया खोलीमध्ये ठेवावे.( संडास , बाथरुम जोडुन असलेली खोली )
- आजारी व्यक्तीच्या आहाराकडे लक्ष देणे .
- आजारी व्यक्तीच्या व्यक्तीगत स्वच्छतेकडे लक्ष देणे .
- आजारी व्यक्तीपासुन लहान मुले /गर्भवती स्त्री व वयोवृध्द व्यक्तींना दुर ठेवणे .
- जोखीमचे व्यक्तीपासुन कमीत कमी ०६ फुट दुर राहणे.
- जोखीमच्या व्यक्तीने संपर्कात येणा-या व्यक्तीने मास्कचा वापर करावा.
- आजारी व्यक्तीचा रुमचा दरवाजा शक्यतो लावलेला असावा.
- घरी उपचार करित असतांना नातेवाईक ांना वारंवार घरी येऊ देऊ नये.
- एकाच व्यक्तीने औषधी द्यावे.

हात स्वच्छ धुवावे. ( २० सेकंद व अल्कोहल युक्त क्लीनर )

- जनावरांपासुन ( डुक्कर) ०६ फुट दुर राहावे. डुक्कर असलेल्या वातावरणापासुन शक्यतो दुर राहावे.
- लहान मुलांना उपचार करतांना खाद्यावर घ्यावे.

मार्गदर्शक तत्व ( शाळा व कॉलेजसाठी )

- मोठे संमेलने /शाळा/कॉलेज बंद करु नये. जेणे करुन भितीचे वातावरण निर्माण होणार नाही. व स्वाईन फल्यु बद्दल जनजागरण होण्यास मदत होईल.
- स्वाईन फल्यु ( इनफल्युनझा ) सारखे लक्षणे आढळुन आल्यास वैद्यकीय वरिष्ठांना संपर्क करुन संमेलने /शाळा/कॉलेज बंद करण्या बाबत निर्णय घ्यावा
- लहान मुले / गभवती स्त्री व वयोवृध्द व्यक्तींना संमेलनामध्ये भाग घेऊ नये असा सल्ला देण्यात यावा

आपतकालीन उपचाराची गरज कोणत्या रुग्णाला आहे :-

श्वास घेण्यास त्रास होणे / छाती दुखणे / ओठ काळेनिळे होणे / वांरवार उलटया येणे /झटके येणे /डिहायड्रेशन होणे.

स्वाईनफल्यु किवा स्वाईन इन्फल्युनझा बाबत मागदर्शक तत्वे.

गर्दीच्या ठिकाणी जाऊ नये. उदा. बसस्टॅंड रेल्वे स्टेशन, हॉटेल, सिनेमागृह
खोकलतांना / शिंकतांना नाकावर / तोंडावर रुमाल ठेवावा.
शक्यतो प्रवास टाळावा.
रुग्णालयात नातेवाईक म्हणुन भेटण्यास शक्यतो टाळावे.
लहान मुले / वयोवृध्द व्यक्ती व गर्भवती स्त्री यांनी नातेवाईक म्हणुन कोणत्याही रुग्णास भेटावयास जाऊ नये.
बाहेरचें उघडे तळलेले पदार्थ खाऊ नये.
कोणत्याही आजाराबाबत ( सरकारी / खाजगी ) डॉक्टरांचा सल्ला घ्यावा व संपर्कात राहावे.

----------ooooo----------

जिल्हा शल्य चिकित्सक
परभणी